# जाहिरात

**शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांचे अधिनस्त सेवानिवृत्त गट- ब अधिका-यांच्या सेवा सेवाकरार पध्दतीने विवक्षीत कामासाठी नियुक्ती देणेबाबत.**

**शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**doestt@gmail.com**

शालेय शिक्षण विभागाअंतर्गत विवक्षीत सेवा/ कामांसाठी विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर, २०१६ नुसार सेवानिवृत्त गट - ब अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घ्यावयाच्या आहेत. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. सेवाकरार पध्दतीने विवक्षीत कामासाठी नियुक्ती देणेबाबत पदांचा तपशील, शैक्षणिक अर्हता, मानधन, संवर्ग खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नामिका सूचीत (Panel) नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तींची संख्या | विवक्षित कामाचे स्वरुप | कालावधी | देय मासिक पारिश्रामिक |
|---|---|---|---|---|
| १ | १ | शालेय शिक्षण विभागाच्या ई गव्हर्नन्स अंतर्गत सांख्यिकीय स्वरुपाची विविध कामे. | **१ वर्षे** | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण /२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील ड(१)(क) नुसार |

१. अर्हता व अनुभवः-

अ) विवक्षित कामासाठी अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त गट - ब अधिकाऱ्यास विवक्षित कामाचा किमान तीन वर्षाचा सांख्यिकी विभागातील अनुभव असणे आवश्यक असून गणित किंवा सांख्यिकी विषयातील पदव्युत्तर पदवी ही शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे. शालेय शिक्षण विभागात काम केल्याचा अनुभव तसेच संगणकीय कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

ब) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त गट-ब अधिकाऱ्याने तो शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

क) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त गट- ब अधिकारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसावी.

२. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी नामिकासूचीमध्ये निवड केलेल्या संबंधित व्यक्तीची राहील. शासनाने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/ २७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच शालेय शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे बंधपत्र/हमीपत्र संबंधित व्यक्तीने सादर करणे आवश्यक आहे. या शासन निर्णयामध्ये नमूद तरतूदीनुसार नियुक्त अधिका-यास मानधन देय राहील.

३. उपरोक्त नमूद बाबींची पूर्तता करणा-या सेवानिवृत्त गट-ब अधिकारी यांना अर्ज करता येईल.

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर, २०१६ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्ती मान्य असणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याने विवक्षित कामासाठी सेवा करार पध्दतीने नियुक्तीबाबतचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून **आठ** दिवसापर्यंत

सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील अशा प्रकारे **शिक्षण आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१** या पत्त्यावर पोस्टाद्वारे, **doestt@gmail.com** या ई-मेलव्दारे अथवा समक्ष सादर करावेत.

**(विशाल सोळंकी, भा.प्र.से.)**
आयुक्त, शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांचे अधीनस्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवाकरार पध्दतीने विवक्षित कामांच्या नियुक्तीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना.**

१. संपूर्ण नाव :

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :

३. दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र :

४. ई मेल :

५. जन्म दिनांक :

६. सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण :

७. ७ व्या वेतन आयोगानुसार पे मॅट्रीक्स :

८. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास असलेले वय :

९. शैक्षणिक अर्हता व अनुभव :

१०. आतापर्यंत केलेल्या सेवेचा तपशील :